पर्यावरणीय प्रशासन व सार्वजनिक धोरण

डॉ.व्ही.एस.इंगळे
मार्गदर्शक, प्रोफेसर व राज्यशास्त्र विभाग प्रमुख गो.सी गावंडे महाविदयालय, उमरखेड

संदीप लक्ष्मण वाघ
संशोधक विदयार्थी, गो.सी गावंडे महाविदयालय, उमरखेड

प्रस्तावना

मानव प्राणी हा मुळात पृथ्वीवरील पर्यावरणातील अनेक घटकांपैकी असणारा एक घटक आहे.वातावरण नदी,डोंगर,तलाव,समुद्र तसेच सर्व प्राणी वनस्पती इत्यादिंचा अंतरभाव पर्यावरण या संकल्पनेत होतो. सर्व सजीवसृष्टी आणि निर्जीवसृष्टी हे पर्यावरणाचे ढोबळमानाने पडलेले दोन मुख्य भाग आहेत. पृथ्वीवरील विविध प्रदेशात वेगवेगळे वातावरण आहे तेथील वातावरणाशी समन्वय साधून प्रत्येक सजीवाने आपले जीवन विकसीत केले हवा, पाणी, सुर्यप्रकाश यांचा वापर करुन वनस्पती आपला अधिवास बनवतात त्या अधिवासात वनस्पतींवर आधारित प्राणी संस्था निर्माण होतात. एकमेकांवर अवलंबून अशी जीवनपध्दती तयार होवून त्या आपल्या पिढयांनपिढया सहयोगी जीवन जगातात.

मानव प्राणी हा सुध्दा याच सृष्टीवरील असंख्य सजीवांपैकी एक सजीव आहे त्याने आपल्या बुध्दीच्या बळावर एक वेगळी मानवसंस्कृती निर्माण केली आहे. पृथ्वीतलावर जे नैसर्गिक बदल होतात त्यासाठी हजारो लाखो वर्ष लागतात. या होणा-या बदलांमध्ये वनस्पती व प्राणी स्वत:ला ढाळतात पण मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या मदतीने असे काही बदल जीवसृष्टी चालू करणे चालू केले की, त्यामुळे पृथ्वीवरचे वातावरण, जैवविविधता व प्राण्यांच्या अधिवासांचे प्रचंड नुकसान झाले. मानसाने आपली प्रगती करतांना फक्त आर्थिक विकास डोळयासमोर ठेवला आर्थिक प्रगती करतांना रस्ते, विज प्रकल्प, धरणे, शहरीकरण, औदयागिकीकरण, स्वयंचलित वाहने, प्लास्टीकची निर्मिती रासायनिक खते, किटनाशक विषारी औषधे, धातु व खनिज निर्माण करणा-या खाणी, औष्णीक विज केंद्रे, अनुउर्जा निर्मित संशोधन केंद्र, अनुभटया, विस्फोटक शस्त्रास्त्र निर्मिती, विमानतळे, जहाजांची बंदरे, तेल उत्पादन केंद्रे, रिफायनरी कंपन्या या आणि अशा प्रकारच्या अनेक वस्तु मानवाने काळाच्या ओघात बनवल्या व बनवत आहे. या प्रगतीचा आलेख उत्तरोत्त्र वाढत गेला आहे. हा सर्व बदल होत असतांना माघे वळून पाहिले तेव्हा लक्षात आले की, आपण जी प्रगती केली. त्यामुळे पर्यावरणाचा मोठा -हास झाला विकासाच्या नावाखाली आपण केलेल्या गोष्टींमुळे सर्व वातावरण बदलले प्रदूषण वाढले, अन्न् घटक विषारी झाले अनेक वनस्पती प्राणी व किटक यांच्या प्रजाती कायमच्या नष्ट झाल्या व काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. तेंव्हा हा विकास शाश्वत नाही. म्हणून शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे योग्य प्रशासन व धोरण अवलंबने गरजेचे आहे.

स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर जनजागृती करुन हरीत विकास करण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणाला हानी न पोहाचवता झालेला विकास हाच भविष्यातील मानवजातीचा खरा विकास ठरेल हे निष्पन्न् झाल्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी सार्वजनिक धोरण निर्मिती करणे व त्यादृष्टीने पर्यावरणाचे संवर्धन करणे गरजेचे ठरले. त्यासाठी राष्ट्रीय स्तरावर कार्य करणा-या शासकीय कारभाराची माहिती घेऊया.

भारत सरकारची पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठीची भुमिका :-

1) पर्यावरण संरक्षण कायदा 1986 :-

पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ हा भारतीय संसदेचा एक कायदा आहे. तो मे १९८६ मध्ये अधिनियमित करण्यात आला आणि १९ नोव्हेंबर १९८६ रोजी अंमलात आला. त्यात २६ कलमें आणि ४ प्रकरणे आहेत. हा कायदा भोपाळ वायू गळतीला दिलेला प्रतिसाद म्हणून तयार करण्यात आला, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. हा कायदा भारत सरकारने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २५३ अंतर्गत संमत केला, जे केंद्र सरकारला देशाने स्वाक्षरी केलेल्या आंतरराष्ट्रीय करारांना अंमलात आणण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार देते. या कायद्याचा उद्देश मानवी पर्यावरणावरील संयुक्त राष्ट्र परिषदेच्या निर्णयांची अंमलबजावणी करणे हा आहे. हे निर्णय मानवी पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा, तसेच मानव, इतर सजीव, वनस्पती आणि

मालमत्तेला होणारे धोके टाळण्याशी संबंधित आहेत. हा कायदा एक 'छत्री' कायदा आहे, ज्याने भारतातील पर्यावरण नियमन व्यवस्थेसाठी एक चौकट प्रदान केली आहे. यामध्ये सर्व प्रमुख औद्योगिक आणि पायाभूत सुविधांच्या कार्याचा समावेश होतो आणि किनारी भागांमधील व पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांमधील विशिष्ट कार्यांवर बंदी घालून त्यांचे नियमन केले जाते. या कायद्यात जल कायदा आणि वायू कायदा यांसारख्या इतर पर्यावरण-संबंधित कायद्यांनुसार स्थापित विविध केंद्रीय आणि राज्य प्राधिकरणांच्या क्रियाकलापांच्या समन्वयाची तरतूद देखील आहे.

2) हवा प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा 1981 :-

हवा प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा, १९८१ देशातील सभोवतालच्या हवेची गुणवत्ता अबाधित ठेवण्यासाठी तयार केला गेला. या कायद्यान्वये उद्योग व कारखान्यांतून उत्सर्जनाचे नियंत्रण केले जाते, ज्यायोगे हे उत्सर्जन हानिकारक पातळीच्या खाली ठेवले जाते. या कायदयात अशी तरतूद आहे की ज्याद्वारे प्रदूषण नियंत्रण मंडळे प्रदूषण करणारे औद्योगिक उपक्रम करण्यास परवानगी नसलेले काही भाग चिन्हांकित करू शकतात.

या कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास तो गुन्हा ठरतो आणि अशा व्यावसायिकाला किंवा व्यक्तीला हवा प्रदूषण केल्याबद्दल फौजदारी खटल्यांना तोंड द्यावे लागते. या कायद्यान्वये परिसरात रहाणाऱ्या प्रत्येक वापरकर्त्याला प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी जेव्हा विचारले असेल तेव्हा ती माहिती देणे बंधनकारक आहे.

3) वायु प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी शासनाने उचललेली पावले :-

- भारतभर वातावरणीय हवा गुणवत्ता देखरेखीची स्थापना.
- पर्यावरण (संरक्षण) अधिनियमांतर्गत वातावरणाच्या हवेच्या गुणवत्तेच्या मानकांची अधिसूचना.
- १९९०-९१, १९९६, १९९८, २०००, २००१ साठी वाहनांच्या उत्सर्जनाच्या नियमांची अधिसूचना.
- पेट्रोलमधून शिसे काढून इंधन गुणवत्ता सुधारणे, डिझेलमधील सल्फर कमी करणे, गॅसोलीनमधील बेंझिन कमी करणे. पेट्रोल व डिझेलमध्ये इथेनॉल चा समावेश करणे.
- सीएनजी किंवा एलपीजी, हायब्रीड आणि इलेक्ट्रिकसारख्या पर्यायी इंधनावर चालणाऱ्या वाहनांच्या वापराबाबत जागृती करणे.
- सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे,
- मोठ्या प्रमाणात प्रदूषण करणाऱ्या व्यावसायिक बाहनांना टप्पाटप्याने कमी करणे.
- लोकांमध्ये जनजागृतीची मोहीम आखणे.

4) ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी निर्गमित केलेली मानके :

जीवनशैली आणि मानकांनुसार जगातील वेगवेगळया देशांची स्वतःची ध्वनी प्रदूषणची मानके आहेत. भारतात, ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डने (बीआयएस) औद्योगिक क्षेत्रातील ध्वनी पातळी ४५ ते ६० डीबीदरम्यान ठेवण्याची शिफारस केली आहे. व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य कायदयानुसार सर्वत्र स्वीकारलेली मर्यादा पातळी (थ्रेशोल्ड लिमिट व्हॅल्यू) (टीएलव्ही) प्रतिदिन ९० डीबी ९ तासांसाठी, ९५ डीबी ४ तासांसाठी, १०० डीबी २ तासांसाठी आणि ११५ डीबी १५ मिनिटांसाठी आहे.

अ.क्र	स्त्रोत	साधारण तीव्रता (डेसिबल)
1	श्वास	10
2	कुजबुज	20-30
3	ग्रंथालय	30-35
4	कमी आवाजातील रेडिओ	35-40
5	सामान्य संभाषण	35-60
6	ऑफिसचा आवाज	60-80
7	रहदारी	50-90
8	धावणारी मोटारसायकल	115-120
9	जेट विमानाचे उड्डाण	140-150
10	अंतराळ रॉकेटचे प्रक्षेपण	160-180

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) दिवसा भारताच्या दिल्ली, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू, मुंबई, हैदराबाद, कानपूर आणि जयपूर यांसारख्या भारतातील आठ प्रमुख शहरांमध्ये ध्वनी प्रदूषण सर्वेक्षण केले आणि त्यांच्या ध्वनी प्रदूषणाची पातळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. अशीच परिस्थिती जगातील बहुतेक सर्व भागांत दिसून येते आणि दिवसेंदिवस ती अधिकाधिक बिघडत चालली आहे.

5) घन कचरा व्यवस्थापन कायदा 2016 :-

भारतातील कचऱ्याच्या उत्तम व्यवस्थापनासाठी केंद्रीय पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालयाद्वारे दिलेले नगरपालिका घनकचरा व्यवस्थापन नियम (२०००) हे मुख्य मार्गदर्शक स्रोत आहेत. २०१६ मध्ये पर्यावरण मंत्रालयाने घन कचरा व्यवस्थापन नियमात सुधारणा केली.

घन कचऱ्याच्या चांगल्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक नागरिकाने कचऱ्याचे जीवनचक्र म्हणजेच घन कचऱ्याचा संकलन करण्यापासून ते विल्हेवाट लावण्यापर्यंतचा प्रवास समजून घेतला पाहिजे. यामुळे कचऱ्याचा पर्यावरणावर, लोकांवर आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम कमी होण्यास मदत होते.

6) महाराष्ट्रातील प्लास्टीकवरील बंदी :-

महाराष्ट्र सरकारने २३ मार्च २०१८ पासून प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्लास्टिकवरील बंदीची अंमलबजावणी सुरू केली. शहरी व ग्रामीण नागरी संस्था, जिल्हाधिकारी, वन अधिकारी, पोलीस अधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना बंदीची अंमलबजावणी करण्यास व कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या बंदीचे उल्लंघन केल्याबद्दल दंड ₹५००० (प्रथम गुन्हा), ₹ १०,००० (दुसऱ्यांदा) आणि ₹ २५,००० (तिसऱ्या वेळी) पासून तीन महिन्यांच्या तुरुंगवासही होतो.

बंदी घातलेल्या वस्तू

- प्लास्टिक पिशव्या (५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या)
- वापरून फेकून / टाकून देण्यात येणारे प्लास्टिक पेले, चमचे, कप,बशा इ.
- वापरून टाकून देण्यात येणारे थर्माकोल, बशा, डबे, कप, पेले, सुशोभनासाठी करण्याच्या वस्तू इ.
- वेष्टनासाठी व उत्पादने साठवण्यासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक

बंदी नसलेल्या वस्तू

- PET बाटल्या (> ५०० मि.ली.)
- औषधे, शेती व घनकचरा साठवण्यासाठीचे प्लास्टिक
- रोपवाटिकेसाठी वापरण्यात येणाऱ्या पिशव्या व गुंडाळी
- अन्नपदार्थांसाठी वापरलेले ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे प्रथम दर्जाचे प्लास्टिक
- दुधासाठी वापरण्यात येणाऱ्या पिशव्या (५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या)

7) स्वच्छ भारत अभियान :-

2 ऑक्टोंबर 2014 रोजी पंतप्रधानांनी देश स्वच्छ करण्याच्या हेतुन हा कार्यक्रम सुरु केला. हा कार्यक्रम शाश्वत विकास उद्दिष्ट क्रमांक ६ वर आधारित आहे. याचा प्रमुख उद्देश प्रत्येक कुटुंबाला स्वच्छतेच्या सुविधा मिळाव्यात असा आहे. यामध्ये शौचालयांची उभारणी तसेच घन व द्रव स्वरूपातील कचरा विल्हेवाट लावणे यांचा समावेश आहे. तसेच गावे स्वच्छ व सुरक्षित करणे व पुरेसा पाण्याचा पुरवठा २०१९ पर्यंत करणे हीसुद्धा याची उद्दिष्टे आहेत.

8) नमामी गंगे अभियान :-

2014 मध्ये पंतप्रधानांनी आपल्या गंगा नदीतील प्रदूषण प्रभावीपणे काढण्यासाठी, नदीचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्यासाठी 20 हजार कोटी रु.ची तरतूद करुन हा प्रकल्प् सुरु केला.

9) उपभोक्ता संरक्षण कायदा 1986 :-

१९८६ मध्ये भारतीय संसदेने मंजूर केलेला उपभोक्ता संरक्षण कायदा खालील अधिकार प्रधान करतो.

- घातक वस्तू आणि सेवांपासून संरक्षण करण्याचा अधिकार.
- वस्तू आणि सेवांचे प्रमाण आणि कामगिरीबद्दल माहिती देण्याचा अधिकार.
- उत्पादने व सेवा यांची तुलनात्मक दरांद्वारे खुलेपणाने निवड करण्याचा हक्क.

- कोणत्याही निर्णयावर सुनावणीचा हक्क ग्राहकांच्या हिता बाबतचा अधिकार.

10) हरित इमारत :-

हरित इमारत किंवा शाश्वत रचना म्हणजे संसाधनांचा कार्यक्षम वापर, यामध्ये क्षेत्र निवड, रचना बांधकाम व देखभाल यांच्या दरम्यान पर्यावरण व मानवी आरोग्यावर होणारे परिणाम कमी करते.

हरित इमारतीच्या रचनेमध्ये ५ मुख्य घटक आहेत. जसे, बांधकाम सामग्री, ऊर्जा, पाणी व आरोग्य व चार R तत्त्वे - (कमी करा (Reduce), पुनर्वापर करा (Reuse), पुनर्चक्रीकरण (Recycle) व पुनर्प्राप्ती करा (Recover))

इंडियन ग्रीन बिल्डिंग काउन्सिल (आयजीबीसी) २००१ ही भारतात निवासी क्षेत्रासाठी हरित इमारतींच्या चळवळीचे नेतृत्व करीत आहे.

11) इको-मार्क पदधत :-

भारत सरकारने पर्यावरणपूरक उत्पादनांची सहज ओळख पटवण्यासाठी १९९१ मध्ये 'इकोमार्क' म्हणून ओळखली जाणारी इको-लेबलिंग योजना सुरू केली. पर्यावरणास कमी हानिकारक अशी उत्पादने ग्राहकांना सहज ओळखता यावीत व ती विकत घेण्यास त्यांना प्रोत्साहित करावे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

इको-मार्कचे असणारे निकष

उत्पादनप्रक्रिया, वापर व वापरानंतर विल्हेवाट लावताना पर्यावरणाची हानी लक्षणीय प्रमाणात कमी करणाऱ्या उत्पादनांवर इको-मार्क लेबल केले जाऊ शकते.

इको मार्क प्रदान करण्याचे निकष हे उत्पादनाच्या सर्व टप्प्यांना समाविष्ट करतात. याला उगमापासून ते अंतापर्यंतचा दृष्टिकोन देखील म्हटले जाते. मुख्य घटकांमध्ये स्रोत आणि वापरल्या गेलेल्या कच्च्या मालाचा प्रकार, नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य कार्यक्षम वापर, ऊर्जा कार्यक्षम उत्पादन, कचरा व्यवस्थापन आणि उत्पादनाची विघटनशीलता यांचा समावेश आहे.

इको-मार्कसाठी असणा-या आवश्यक बाबी

- भारतीय मानक संस्थांच्या (बीएसआय) संबंधित मानकांची पूर्तता करणारी उत्पादने.
- उत्पादनातील आवश्यक घटकांची प्रमाणानुसार उतरत्या क्रमाने यादी प्रदर्शित करणे.
- ज्या निकषांवर हे उत्पादन पर्यावरणपूरक आहे, ते निकष व त्याच्या योग्य वापरासंबंधीचा तपशील वेष्टनावर दर्शविणे.
- वेष्टनासाठी वापरली जाणारी सामग्री पुनर्वापर /पुर्नचक्रीकरण करण्यायोग्य व जैव विघटनशील असावी.

इको मार्क तांत्रिक समितीने १६ उत्पादनांच्या श्रेणीसाठी इको मार्क सूचित केले आहे. यामध्ये मुख्यतः साबण आणि डिटर्जंट्स, कागद, वंगण तेल, वेष्टन साहित्य, पेट्स, बॅटरी, इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधने, प्लास्टिक उत्पादने, चामडे इ.चा समावेश आहे.

भारतातील इको-मार्क योजनेचा लोगो म्हणून मातीचे भांडे निवडले गेले आहे. जे मातीसारख्या पुनर्वापरायोग्य संसाधनाचा वापर करते, कमी ऊर्जेत तयार होते. तसेच घातक कचरा निर्माण करत नाही. त्याचे घन आणि डौलदार स्वरूप टिकाऊ व मृदुता दोन्हींचे प्रतिनिधित्व करते.

12) पाणी प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा 1974 :-

पाण्याच्या स्रोतांचे प्रदूषण होण्यास प्रतिबंध करणे व पाण्याच्या शुद्धतेचे रक्षण करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. या कायद्यान्वये केंद्रीय व राज्य प्रदूषण मंडळे स्थापन झाली. उद्योगांची सुरुवात होण्याच्या आधी देण्यात येणाऱ्या मंजुरी व परवानग्यांचे नियंत्रण ही मंडळे करतात.

या कायद्यान्वये कोणत्याही प्रकारचे प्रदूषित पाणी निर्देशित प्रक्रियेशिवाय कोणत्याही प्रवाहात अथवा पाण्याच्या स्रोतात (जलाशयात) सोडण्यास मनाई केली आहे. या कायद्यान्वये जो कोणी पाण्याचे प्रदूषण करतो, तो आरोपी दंड व तुरुंगवासाच्या शिक्षेस पात्र ठरतो. प्रदूषण नियंत्रण मंडळे ही परवानग्या व मंजुऱ्या देणारी शासकीय मंडळे आहेत आणि पाण्याचे स्रोत प्रदूषणारहित ठेवण्याचे कार्य त्यांच्याकडे सोपवले आहे.

अशा प्रकारे भारत सरकारने पर्यावरण संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विविध कायदे करुन व योजना आखून पर्यावरणाचा -हास थांबवला.

पर्यावरणीय प्रशासनातून गाठावयाची उदिदष्टये :-

1. नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे
2. हवामान बदल व त्याचा दुष्परिणाम रोखणे
3. वने व जंगले यांचे संरक्षण करणे
4. वाळवंटीकरण होण्यापासून जमिनीचे संरक्षण करणे.
5. जैवविविधतेचे संवर्धन करणे
6. महासागर व समुद्रांचे संवर्धन करणे
7. भविष्यातील मानवजातीसाठी संसाधनाचे संरक्षण करणे.

निष्कर्ष

1. स्थानिक, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण बचाव मोहिम सुरु झाली.
2. विकसित राष्ट्र व विकसनशिल राष्ट्र यांच्यात पृथ्वीचे तापमान कमी करण्यासाठी एकमत झाले.
3. सार्वजनिक धोरणे ठरवितांना आणि त्यांची अंमलबजावणी करतांना निसर्ग व पर्यावरण यांना हानी पोहोचनार नाही याची दक्षता घेण्यात आली.
4. पर्यावरणाला धोका निर्माण करणारे धोरण बदलण्यात आले.
5. प्रदूषण टाळून स्वच्छ उर्जास्त्रोत शोधण्यात आले.

सारांश

जगात दोन मोठे गट पडलेले आहेत, अधिक विकसित देश आणि कमी विकसित देश. या दोन गटातील अंतर कमी झाले पाहिजे. अधिक विकसित देशात जगाच्या फक्त २२% लोक राहतात, पण ते एकूण संसाधनांच्या ८८% नैसर्गिक संसाधने वापरतात, एकूण ऊर्जेच्या ७३% ऊर्जा वापरतात आणि त्यांच्याकडे एकूण पैशापैकी ८५% पैसा आहे, आणि ते भरपूर प्रदूषण करतात. याउलट कमी विकसित देशांमध्ये अगदी कमी किंवा बेताची औद्योगिक बाढ आहे आणि त्यांच्याकडे जगातील एकूण लोकसंख्येच्या ७८% लोकसंख्या आहे. ते फक्त १२% नैसर्गिक संसाधने वापरतात. एकूण ऊर्जेच्या २७% ऊर्जा वापरतात आणि त्यांच्याकडे जगातील एकूण पैशांपैकी फक्त १५% पैसा आहे. श्रीमंत देश अधिक श्रीमंत झाले आहेत व गरीब देश अधिक गरीब झाले आहेत. या दोघांमधील दरी कमी होणे गरजेचे आहे, या समस्येवरील उपाय म्हणजे संसाधने व पैसा यांचे न्याय्य वाटप झाले पाहिजे. यासाठी सर्व जगाचे, सर्व देशांचे एकमत झाले पाहिजे. अशाश्वत विकासाची दोन मुख्य कारणे पुढीलप्रमाणे आहेत. गरीब देशांमधील अधिक लोकसंख्या ,श्रीमंत देशांमधील लोक संसाधनांचा अति वापर करतात. या श्रीमंत देशांनी संसाधनांचा वापर कमी केला पाहिजे. ही आजच्या काळाची गरज आहे की गरीब व श्रीमंत देशांनी नैसर्गिक संसाधनांचा वापर सामाईकपणे केला तरच शाश्वत विकास होईल.